## खंड 13 वा

आदि प्रभुचे पराक्रमी कुल । तत्पुत्रांची सुकीर्ति उज्जल ।।
भरतेशाचे जगजेतेपण । बाहूबली चे आत्मसमर्पण ।।
ती न विभूती एक अहिंसा । जैन जितेंद्रिय धर्म प्रशंसा ।। 1
धर्म अहिंसा स्वयें मारि ना । मारिति त्याला मारु देइना ।।
प्रतिकारकता आत्म्याचा गुण । सत्यधर्म तो आत्मसमर्थन ।।
आत्मसमर्थन सहिष्णुता ती । आत्मसमर्थन ती रणनीती ।।
रणनीती मधि युद्ध संभवे । आणि हत्या घडे स्वभावे ।। 2
जिथे रणांगण तिथेच हिंसा । तिथे कोठला धर्म अहिंसा ।।
गमेल कोणा अवघड कोडे ।। धर्मात्याना मार्ग सापडे ।। 3
धर्म मारिना धर्म मरेना । मरेल त्याना नको हाणेना ।।
नश्वर तनु ही उदया जायची । जिवा जिवाची होळि व्हायची ।।
होळी मधले किती अग्निकण । अग्निकणाला हवेच इंधन ।।
इंधन हाणाजे जगांत जडता । मी न जगी जड म्हणे जाणता ।।
जिवा जिवातिल जाणिव आत्मा । जीव व्हायचा जगि परमात्मा ।। 4
जगांत भांडण जिथे तिथे कां । कुणि धर्मात्मा घेईल शंका ।।
शंकित मानस अहंकृती ती । जीव जडाची कुसंगती ती ।।
कुसंगती ने जीव नासतो । आणि जडाच्या अंकित होतो ।।
हीच जिवाची पराधीनता । तिथें पाहिजे निजात्मसत्ता ।। 5

या खंडात मागील 12 खंडात मांडल्या गेलेल्या कथांचा व त्या अनुषंगाने जैनधर्माच्या तत्वांचा विचार उजळणी रूपाने मांडला आहे. हा समारोप आहे. अदिगीतेच्या महन मंगल विचारांनी प्रमुदित झालेल्या मनाला या खंडातून समग्र दर्शन घडविले आहे.

आदिप्रभूंच्या पराक्रमी, आत्मजयी, प्रसन्न, ऐश्वर्यवान जीवनाची गाथा किती ही गायली तरी सारे स्वर, ताल, छंद अपुरे पडतील. त्यांच्या सुपुत्रांचे आदर्श भावजीवन व कार्य यामुळेही चेतनेला नवा

आशय प्राप्त होईल. भरताचा पराक्रम, बाहूबली ंचा त्याग आणि आदि जिनांची जितेंद्रियता या तिघांचा मनोहर विलास यात सांपडतो. या ती न्ही विभूती ंनी आचरलेली अहिंसा, सत्य, व जितेंद्रियता यामुळे त्यांची जी वने आदर्श बनली आहेत.

अहिंसा धर्म स्वतः हिंसा करायला सांगत नाही , स्वतः हिंसा करी त नाही , आणि इतरांना करु देत नाही . विकारांना साक्षी रुप राहून तेजस्वी प्रतिकार करणे हा आत्म्याचाच धर्म आहे. कारण त्यात आत्माच वंदनी य आहे. आत्म्याप्रती आत्म्याचेच समर्पण आहे. सर्व भेदभावांना तिलांजली देऊन परमात्म्याच्या रुपाशी एकरुप होणे ही च आत्म्याची स्वभावसिद्ध अवस्था आहे. प्रतिकाराचे सामर्थ्य म्हणजेही आत्मोपलब्धी . प्रतिकाराचे सामर्थ्यही आत्म्यातून येते. जडातून येत नाही . जड तर स्पष्ट तःच उदासी न आहे. त्या जड पदार्थाना कशातच रस नाही . ते आहेत एवढेच. खरी रणनी ती देखी ल ती च जिथे आत्म्याला समर्थन मिळते. इतर रणनी ती चा पराभव होतो.

`आ

आ

भरतभूमिचा धर्म अनावी । परी नांदते जगरगी जडबुध्दी ।।
जी वजडाचे हो रणकंदन। सदाविजयि हो आत्म्याचा गुण ।।
गुण आत्मयाचा सदा जागतोद्य। जिवाजिवाना जागवी त तो ।।
ते पुण्यात्मे धर्म वी रनर। जगदगुरुचे ते तिर्थकर।।
महावी र प्रभु प्रताप बाणा। पुष्यमार्ग नित दावि जिवाना।।
उरे पुण्य जगि सरे पाप ते। धर्मात्म्याची की र्ति गाजते।। 7

सत्य अहिंसा शस्त्र दुधारी । दुर्बलतेची तया शिसारी ।।

धर्म तिथे जय तिथेच वैभव। सत्य साहिना कधि पराभव।। 8

पुण्यात्म्यांना इथे कष्ट कां। धर्मात्म्यांना इथे कष्ट कां।।
जगी पुण्यधन धर्मात्म्याचे । कठिण कसोटी सदैव साचे ।।
कष्टाविण ना मिळे कुणा फळ। दु:ख भोगुनी मरतिल दुर्बल।।
चिरंजीव पद बलवंताना। प्रपंचात सुख वृथा वल्गना।। 9

सुख आत्म्याचे सदा अमूर्तिक। दृश्य जगी ना मिळावयाचे सुख।।
दु:ख भोगिता धर्म घडे तरि। अणि गाठिंशी पुण्य पडो तरि।।
म्हणुनि महात्मा जगी जन्म घे। आणि वर्ततो स्वधर्म योगे।। 10

आत्मसत्तेला सोडून इतर नाश्वंत सत्तेसाठी जी भांडणे आहेत ती केवळ दाहक व नाशक आहेत. कारण आत्मसत्तेची जाणीव तेथे असत नाही. म्हणून भांडणे आहेत. अहिंसा, सत्य अशा भांडणापासून अनेक योजने दूर असतात.

अहिंसा म्हणजे प्रेमाचे विराट अस्तित्व. सदाचार हे अहिंसेचे भावंड. हे दोन्ही ही आत्मप्रेरित असतात. म्हणुनच मागील खंडातून आदिप्रभूचे, श्री भरतेशांचे व श्री बाहूबलींचे जीवनदर्शन घडविण्यात

रणांगणाची जी ओढ मानवात दिसते ती ओढ खऱ्या अर्थाने आत्म्याने आत्म्यावर मिळवावयाची ओढ आहे. सिद्धत्व प्राप्त करुन घेण्याची ओढ आहे. स्वत: जितेंद्रिय होण्याचे ते आकर्षण आहे. जिथे असे नसेल त्या रणांगणात हिंसा होईलच तिथे धर्म नसेल यतो धर्म: ततो जय: असे म्हटले जाते. पण खरा प्राप्त होणे म्हणजेच जय. दुसऱ्यावर मिळविलेला जय हा विनाशी , क्षणिक असतो. व त्यामुळे होणारा आनंद ही कलुषित असतो.

धर्म मरित नाही व स्वत:ही कधी मरत नाही . तो तर तारकच आसतो. ज्यांची उत्पत्ती आहे. त्यांचा नाशही आहे. अवस्थांतरे होणे हा प्रकृती धर्म आहे. आणि त्या अवस्थांतरातही शाश्वत द्रव्यपण कायम राहातो. जीवचा जडाशी संयोग झाला, सहवास घडला, त्या

जडाशी अल्पशी प्रीती झाली तरी जीवाचे जडाशी नाते नाही, याचा अनुभव नेहमी येत राहातो. जर जीवाचे जडाशी कांहीच संबंध नाही त, तर मग जीवाच्या मागे ही दु:खाची टोचणी कां लागून आहे. कां जीव नारकिय दु:ख भोगतो. कां त्याला पशूसारखे जीवन जगावे लागते.

याचे उत्तर प्रभूंनीच दिलेले आहे. जीवाची जडाची कुसंगती हे त्याचे उत्तर. अग्नीची संगती लोखंडाने केली तर घणाचे धाव घ्यावेच लागतात. जडाशी माझे नाते आहे असा त्याचा भ्रम, त्याचा मिथ्या भाव, त्याला पराधीन करतो. व सारी दु:खे पराधीनतेतूनच येतात. ते जाणून घ्यायला आत्मसत्तेची जाण निर्माण व्हायला हवी.

सत्तेसाठी जगांत भांडण। आणि हरपती तिथें आत्मगुण।।
आत्मगुणाची जाणिव जेथे। धर्म अहिंसा सदैव तेथे ।। 6

धर्म अहिंसा सदाचार तो। कधि सत्याला सोडूनि नसतो।।
जवंर होति ना सदाचारि जन। तंवर जगामधे नित रणकंदन।।
तिथे आदिप्रभू भरत बाहूबलि। कथा तयांची विक्रमशाली ।।
राम लक्ष्मण तिथेच सीता। हनुमंताची विक्रम गाथा।।
रावण गेला राम कथा ती। अजूनि गाजते इथे भारती ।।
कुरुक्षेत्रि या पांडव लढले। महाभारतहि इथेच घडले।।
भरतभूमिचा धर्म अनादी। परी नांदते जगी जडबुद्धी ।।
जीवजडाची ही रणकंदन। सदाविजयि हो आत्म्याचा गुण।।
गुण आत्म्याचा सदा जागतो। जिवाजिवाना जागवीत तो।।
ते पुण्यात्में धर्मवीर नर। जगद्गुरुसे ते तीर्थंकर ।।
महावीर प्रभु प्रताप बाणा। पुष्यमार्ग नित दावि जिवाना।।
उरे पुण्य जगि सरे पाप ते। धर्मात्म्याची किर्ति गाजते।। 7

सत्य अहिंसा शस्त्र दुधारी। दुर्बलतेची तया शिसारी ।।
धर्म तिथे जय तिथेच वैभव। सत्य साहिना कधी पराभव।। 8

पुण्यात्म्यांना इथे कष्ट कां।　　धर्मात्म्यांना इथे कष्ट कां।।
जगीं पुण्यधन धर्मात्म्याचे ।　　कठिण कसोटी सदैव साचे ।।
कष्टाविण ना मिळे कुणा फळ।　　दुःख भोगुनि मरतिल दुर्बल।।
चिरंजीव पद बलवंताना।　　प्रपंचात सुख वृथर वल्गना।।　　9

सुख आत्म्याचे सदा अमूर्तिक।　　दृश्य जगी ना मिळावयाचे सुख।।
दुःख भोगिता धर्म घडो तरि।　　आणि गाठिंशी पुण्य पडो तरि।
हाणुनि महात्मा जगी जन्म घे।　　आणि वर्ततो स्वधर्म योगे।।　　10

आत्मसत्तेला सोडून इतर नाशवंत सत्तेसाठी जी भांडण आहेत ती केवळ दाहक व नाशक आहेत. कारण आत्मसत्तेची जाणी व तेथे असत नाही. म्हणून भांडणे आहेत. अहिंसा, सत्य अशा भांडणापासून अनेक योजने दूर असतात.

अहिंसा म्हणजे प्रेमाचे विराट अस्तित्व. सदाचार हे अहिंसेचे भावंड हे दोन्ही ही आत्मप्रेरित असतात. म्हणूनच मागील खंडातून आदिप्रभूचे, श्री भरतेशांचे व श्री बाहूबलींचे जीवनदर्शन घडविण्यात आले. श्री राम व सीतामातेची ही कथा थोडक्यांत सांगितली आहे. रावणाची लंका व रावण इतक्या वर्षांनी अदयापिही जळत / जाळत आहे. रामाची कथा हजारोवर्षे लोकमानसाला विविध रुपाने प्रेरणा देत आहे. कुरुक्षेत्रही भारत भूमीतच आहे. त्याही ठिकाणी महाभारत घडले. त्यातूनही भारतीय संतऋषीनी सांगितलेली अविनाशी तत्वे सांगण्यात आलीं. जीवजीडाच्या भांडणात नेहमी चेतनाच विजयी होते, हा शाश्वत सिद्धांन्त आहे. आत्म्याची अनंत शक्ती जीवात्म्यांना वारंवार जागृत करुन योग्य असा उद्धाराचा मार्ग सांगत आहे. यातूनच तीर्थंकर, वीरपुरुष, ऋषीमुनी यांचा उदय होत आला आहे.

शेवटी भगवान महावीरांची पुण्यगाथा सांगितली आहे. भारतभूचे भाग्य पुण्यमय करणारी, चेतनेला नवीन उजाळा देणारी, धर्मात्म्याची कीर्ती वाढविणारी ती गाथा आहे. आत्मिक दौर्बल्य दुर करुन शूरांची

अहिंसा सांगणारी त्यांची वाणी आहे. सामान्यांच्या जीवनात मांगल्य, श्रद्धा, प्रेम आणि उत्साह आणणारे प्रभू महावीरांचे कार्य आजही अद्वितीय वाटावे असेच आहे.

आदर्शाचा पाठपुरावा करताना नीतिमूल्यासाठी प्राणपणाने झगडा देतांना नेतृत्वाला संकटे भोगावीच लागतात. त्यांना व त्यांच्या नीति मूल्यांची समाज परीक्षा घेतो. पण जे आत्मजयी, बलवान असतात त्या संघर्षात ते विजयी होतात.

प्रपंचातील सौख्याचा पक्ष घेणाऱ्यांचा पराभव होतो, असत्य हिंसा याचा स्वीकार करणारा पराभूत होतो. कारण आत्म्याचे सुख हे अविनाशी असते. प्रभूच्या प्रकाशाने ते सुख उजळून निघालेले असता त्या सुखाचा स्वाद घेतल्याशिवाय त्याची अवीट गोडी कळणार नाही. केवळ शास्त्राच्या वाचनाने, गुरुंच्या आशिर्वादाने सुखाची गोडी कळणार नाही. स्वानुभवानेच ती माधुरी कळेल. त्याचा अनुभव जीवात्म्याला यावा यासाठीच महात्मे जन्माला येतात व आपल्या स्वधर्माच्या तेजाने धर्म प्रवर्तन करतात.

तिथे दु:ख की सौख्य न ठावे। सुख दु:खामधि धर्म आठवे।।
पाप पंकि ना रुते कदापि। पुण्यवंत ना हाणवि कदापि।।
पापपुण्य हे गुण देहाचे। देहि विदेही मला व्हायचे।।
आत्मगुणाची ओळख पटते। जगि कर्माचे बंधन तुटते।।
बंधन सरता विमुक्त आत्मा। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 11

जीव आणि जग जगद् विलासी। प्रीति गमे का परमात्म्यासी।।
जग आत्म्याची प्रयोगशाळा। जगावयाचा जगिं कंटाळा।।
तिथे नसे सुख कशास जगणे। आत्मस्वरुपी सदैव स्थिरणे।। 12

अस्थिर जीवनि रेंगाळति जन। मरण चुकेना आणि दु:ख पण।।
दु:ख सराया हवी च शांति। जगीं सत्य शिव सुंदरता ती।। 13

जिथे सत्य शिव सुंदरता ना। कुठुनि शांति मग मिळे जिवाना।।
जिथे न शांति तिथे अराजक। ज्ञान ना दर्शन चरित्र सम्यक।।
जीव होइना जैन जितेंद्रिय। म्हणुनि भोगि ना निज सुख अक्षय।।
तोवरि चाले विश्व राहाटी । सदा सुखी तो प्रभु परमेष्ठी ।। 14
ऊस तोडिला ऊस गाळिला। सुरस तयाचा किती कढविला।
ढेप गुळाची शुभ्रशर्करा। गुण गोडीचा गमे साजरा।।
जिवाजिवाची आत्मोन्नति ही । आत्मशांतिची तिथेच ग्वाही ।।
म्हणुनि झुंजती वीर आणि नर। देहधारि ते प्रति परमेश्वर ।। 15

चरित्र त्याचे तुम्ही ऐकिले। पुण्य तयाचे मला लाभले।।
पुण्यात्म्याचे चरित्र गाता। सवे पुण्यधन येइल हाता।।
आपण त्यांच्या समान व्हावे। मनी भावना स्फुरे स्वभावे।।
देति थोरपणा दुजा थोर जन। कुणी थोर ना परमात्म्याविण।।
तिथेच शांति तिथे उन्नती । तिथे परमसुख आत्म प्रचीती ।।
सत्य सनात शाश्वत आत्मा।। जीव व्हायचा जगि परमात्मा।। 16

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।।।

त्यांच्या त्या मांगल्यपूर्ण जीवनांत सुख-दु:खांची तमा नसते. पाप-पुण्याच्या पायऱ्या नसतात. देहादि धर्म व त्यांचे विचार-विकारही तेथे शिवत नाहीत. अशा परमश्रेष्ठ महात्म्यांचे दर्शनाने आत्म्याची ओळख पटते. त्यामुळे संसाराचे बंधन तुटते. आणि बंधन तुटले की आत्मा स्वयमेव जीवन-मुक्त होतो.

जीव आणि विश्व यांच्या संयोगात असतांनाही परमात्म्याचे स्मरण घडणे, हा खरा साक्षात्कार आहे. विश्व परमात्म्याची एक भली थोरली प्रयोगशाळा आहे. त्या प्रयोगशाळेतच आत्म्याच्या विविध गुणांचे निरीक्षण, परीक्षण करायचे. विविध प्रयोगांनी जडाचे जडत्व पाहायचे, जीवाचे अविनाशी, शाश्वत गुण तपासायचे. आणि हे सारे

करतांना आत्मरती त स्थिर राहायचे .

जे जी वन जडात गुंतले आहे. ते अळ्वावरच्या पाण्याप्रमाणे अस्थिर, चंचळ, व विनाशी आहे. मरण चुकत नाही , किंवा जन्म-मरणाचा फेराही चुकत नाही . अशा समयी सत्यमय, कल्याणमय व जी वनच उपयोगी पडते. त्या तिन्हीं चा जेथे संगम नाही . तेथे सम्यक् दर्शन, ज्ञान व चारित्र्यही नाही . आणि मग तेथे शांती कोठून येणार. सौख्याची बरसात कोठून येणार. प्रकाशाच्या दिशेने वाट चाल कशी होणार.

आत्म्याची स्पष्ट ,स्वच्छ जाणी व झाल्याशिवाय जितेंद्रियाचे सुख, त्याची शांती , त्याचे अनंतवी र्यत्व कसे समजून येणार. अक्षयसुखाचा स्वामी तो कसा होणार.

जोपर्यंत हे घडत नाही तोपर्यंत ही जगरहाटी अशी च चालत आली व चालत राहणार.

ऊस, उसाचा रस, त्यापासून गुळ, साखर या साऱ्यांत एक अविनाशी माधुर्य आहे. अवस्था वेगवेगळ्या तरी शाश्वत माधुर्य साऱ्यात हे नैसर्गिक तत्वच आत्म्यालाही लागू आहे. साऱ्या जी वात्म्यात चैतन्याचा अक्षय प्रवाह प्रविष्ट आहे, त्या चैतन्याती ल ज्ञान-दर्शन-सुख-वी र्य इत्यादि गुणही साऱ्या जी वात्म्यात नित्य विदयामान आहेत. म्हणुनच तर मानव वारंवार त्या मुक्ती च्या कल्पनेशी झुंजतो. आत्मकल्याणास्तव अनेक कष्ट सोसतो. आणि अंती त्या जी वनातच परमेश्वर बनून जातो. अशाचि ती ने थोरांची चरित्रे चरित्रे मी काव्यातून सादर केली आहेत. आपण ऐकली , वाचली तर आपणही पुण्यवान, आणि मी सांगितली म्हणुन थोडेसे पुण्यक्षण माझ्याही वाट याला आलेत. पुण्यशी ल व भाग्यवंत पुरुषांची चरित्रे नेहमी च प्रेरक व पूरक असतात. त्यांच्या जी वनातून प्रेरणा धेऊन त्यांच्या प्रमाणे आपणही आपल्या आत्म्याचा विकास करुन ध्यावा, मुक्ती ची साधना करावी , अशी भावना झाली तर ते जी व पुण्यवान होत. दुसऱ्याला थोरपण देणारेच खरे थोर होत, हा नियम आहे. आणि अंतरी वसत असलेला परमात्माच हे थोरपण आत्म्याला मिळवून देतो. अन्य कुणी असतात ते केवळ निमित्त.

अशा परमात्म्याच्या साधनेतच सुख, शांति व उन्नति असते.

म्हणुन एक चिर सत्य हेच कि.

।सत्य सनातन शाश्वत आत्मा।

जी व व्हायचा जगी परमात्मा।।

हाच विचार मनांत ठेऊन ही कथा मी पूर्ण करी त आहे,

खंड 14 वा

शांतिमंत्र मुखे म्हणे महात्मा। दे आशिर्वच फुले पौर्णिमा।।
चंद्र तेथला मुनि राजेश्वर । दिव्य विभूति प्रसन्न सुंदर।।
जणु सत्य शिव सुंदरता ती । ज्ञान मंडपि विहरत होती ।।
मुनिराजाची विवेक वाणी । भाव भक्ती ने श्रवन करोनि।।
उचंबळूनि ये भक्त भावना। धर्म तिथे जय होत गर्जना।। 1

धर्म तिथे जय गर्जत जनता। चित्त शुद्ध करि एकात्मकता।।
मनामनाती ल भेद नासतो। आणि प्रगट तो आत्म भाव तो।।
कर्मयोग गुणि आत्म जागृती । धर्म तिथे जय समाजनी ति।। 2

धर्म तिथे जय जय कोणाचा। धर्म कर्म रत जिवा जिवाचा।।
जी व जाणता धर्म जाणतो। जी व जाणता कर्म जाणतो।।
धर्म कर्म रत जी वन क्रांति। तिथे शांतता आत्म प्रचिति ।। 3

सदानंद मति गुणआत्म्याचा। मुनि राजेश्वर प्रतिनिधि त्याचा।।
जिवा जिवाती ल दुरित तिमिर ते। दूर सारितो प्रसन्न चित्ते।। 4

प्रसन्न आत्मा प्रसन्न वाणी । उपदेशामृत जना पाजुनि।।
क्षणि निवारुनि पापतापभय। बनवि जनाला स्वतंत्र निर्भय।। 5

स्वतंत्र निर्भय पुण्य प्रकृति। स्वतंत्र निर्भय चिदानंद मति।।
चदानंद मति शुद्ध भावना। राष्ट्धर्म तो स्वतंत्र बाणा।। 6

जी व जिनेश्वर मुनींद्र वाणी । धर्म निरुपण गुण संजी वनी ।।
शुद्ध स्वच्छ करि समाज जी वन। आत्म शक्ति दे तिथेच दर्शन।।
आत्म शक्तिचे राज्य जगावर। जगांतल्या या जना मनावर।।
जनगण मानस प्रसन्न आत्मा। जी व व्हायचा जगि परमात्मा।। 7

ऊँ शांतिः शांतिः शांतिः ।

ऊँ शांति, शांति, शांति ।

असा मंत्र मुनींनी म्हट ला. जणु त्या शद्बांनी शत सहस्त्र चांदण्या हंसल्या. पौर्णिमेचे चांदणे जणु भूरवर पसरले. थोर थोर ऋषी मुनी हे त्या प्रवचन मंडपात, ज्ञान-मंडपात प्रत्यक्ष सत्यं, शिवं, सुंरम् ही ती न जी वन तत्वेच मुखरित झाली होती . मुनी श्वरांची ती विवेकवाणी आपल्या भक्ती संपुटी धारण करुन अनेकांची मने उचंबळून आली . आणी साऱ्यांनी एका आवाजात-

धर्म तिथे जय होत गर्जना !

अशा घोषणा दिल्या.

त्या घोषणांनी साऱ्यांची मने शुद्व झाली . एकात्म-भाव साऱ्यांच्या हृदयात निर्माण झाला. मनोमनी दडून बसलेला भेद-भाव, पक्षपात, अहंता दूर झाली . आत्मभाव प्रगट ला. कर्म-योग प्रगट ला. व आत्म-जागृती चे आभा प्रत्येकाच्या चेहऱ्यावर चमकू लागली .

ज्याची धर्मावर श्रद्वा, ज्याचा सदाचारावर विश्वास अशा मानवात धर्माचा उदय होतो. जाणता जी वच धर्म जाणतो. धर्म पाळतो, धर्म आचरतो. त्यातून सामजिक क्रांती आणि आनंद या आत्म्याच्याच अवस्था आहेत. आपल्याच आत्म्याच्या आनंदात निमग्न असलेले मुनी हे त्या उत्क्रांत जी वनाचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्यामुळे तिमिराचा क्षय होतो. मानस पवित्र आणि प्रसन्न बनते.

प्रसन्नता हा आत्म्याचा अविनाशी गुण आहे. त्या चैतन्याची ती आभा आहे. प्रसन्न हाणजे आपल्या पदावर आसी न झालेला, आता कांही च करायचे नाही , सारे कार्य पूर्ण झाले आहे, असा भाव

असतो प्रसन्नतेत. मुनी श्वरांची ती वाणी देखी ल अशी च प्रसन्न. त्या वाणी द्वारे उपदेशामृत पाजून, मनाती ल दुर्वासना, क्षोभ, पापे दूर करुन त्यांनी श्रोत्यांना पावन केले, निर्मल केले. निर्भय केले.

स्वतंत्र, निर्भय,पुण्यवान आत्मरत अशा मुनीं नी एका अर्थाने राष्ट्धर्मच सांगितला. स्वातंत्र्य हा जसा राष्ट्राचा कणा, तसेच स्वातंत्र्य हा समाजाचा व व्यक्ती चाही कणा आहे. त्याशिवाय उन्नती होत नाही . प्रगती होत नाही . विकास घडून येत नाही .

कारण प्रत्येक जी वात्मा हा उद्याचा जिनेश्वर आहे. उद्याचा परमात्मा आहे. हे धर्मनिरुपण म्हणजे श्रोत्यांना पाजलेली शाश्वत संजी वनी आहे. त्या स्वातंत्र्याच्या घोषणेतच समाज जी वन, राष्ट्-जी वन स्वच्छ करण्याची ताकद आहे. आत्म्याची जाण, ही आत्म्याची एक शक्ती आहे. त्या शक्ती नेच आजवर जगावर राज्य केले आहे. सम्राटांची नांवे पुसली जातात.विसरली जातात. पण आत्मोद्धारक संत-सज्जनांची नांवे अमर होतात. कारण युगानुयुगे जन-माणसावर संस्कार करण्याचे त्यांचे सामर्थ्य दिक्कालाती त असते.

धन्य आहेत असे ती र्थकरादिक महान विभूती व त्यांची ही पावन करणारी श्री आदिगी ता.

ॐ शांति: शांति: शांति: !